# नैसर्गिक शेतीतील विविध निविष्ठांचे उत्पादन आणि वापर

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आर्या नैसर्गिक शेती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोजे दापशेड तालुका लोहा येथील बऱ्याच वर्षापासून नैसर्गिक शेती करणारे प्रयोगशील शेतकरी श्री विश्वनाथ गोविंदराव होळगे व त्यांचा परिवार व शेतकरी गट विविध नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठा यांचा वापर करून विविध भाजीपाला तसेच फळांचे उत्पादन करून स्वतः बाजारात जाऊन विक्री करतात, त्या नैसर्गिक पद्धतीने पिकविलेल्या विविध भाजीपाला पिकांची पाहणी करण्याचा योग आयोजित शिवार फेरीत साधण्यात आला. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्र पोखरणी, नांदेड निर्मित ,"नैसर्गिक शेतीतील विविध निविष्ठांचे उत्पादन आणि वापर" यावर आधारित घडी पत्रिकेचे विमोचन माननीय जिल्हाधिकारी नांदेड,अभिजीत राऊत सर, भाऊसाहेब बराटे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड, सौ अर्चना गुंजकर, प्रकल्प उपसंचालक ,आत्मा, नांदेड तहसीलदार विठ्ठल परळीकर लोहा ,तालुका कृषी अधिकारी लोहा सदानंद पोटपेलवार तसेच कृषी कर्मचारी व शेतकरी बांधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी माननीय जिल्हाधिकारी ,नांदेड यांनी नैसर्गिक शेती यावर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच शिवार फेरी ला सुद्धा उपस्थिती लावली.
















